अतितात्काळ

क्र.पोमसं/९/एनजीओ/संस १४.१५/१४०/१५ मुंबई, दिनांक१२.०६.२०१५

**विषय:** संशयास्पद सचोटी असलेल्या राजपत्रित अधिका—यांची यादी बनविण्याबाबत.
सन २०१४.१५ ( दि. १.४.२०१४ ते ३१.३.१५)

.....

उपरोक्त विषयास अनुसरून खालील घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. सीडीआर्—१००५/प्र.क्र.१/०५/११, दिनांक ३०.१०.२००६ मध्ये देण्यात आलेल्या सूचनेनुसार पोलीस दलातील संशयास्पद सचोटी असलेल्या राजपत्रित अधिका—यांची सन २०१५ ची यादी तयार करणे आवश्यक आहे. याकरिता शासन गृह विभाग,परिपत्रक क्र. ऐसीबी—०५०३/सीआर १५९/पोल—२, दिनांक ०५.०४.२००४ अन्वये पोलीस दलातील निरनिराळया घटकांसाठी समित्या गठीत केल्या आहेत. तरी सर्व घटक प्रमुखांनी सन २०१४.१५ (दि. १.४.१४ ते ३१.३.१५) ची **त्यांच्या घटकांतील संशयास्पद सचोटी असलेल्या राजपत्रित अधिका—यांची यादी समिती अध्यक्षांकडे दिनांक ३०.०६.२०१५ पर्यंत न चुकता पाठवावी.**

२. संशयास्पद सचोटी असलेल्या राजपत्रित अधिका—यांची यादी समिती अध्यक्षांकडे पाठविताना घटक प्रमुखांनी संबंधीत अधिका—यांची नावे यादीमध्ये सामाविष्ट करण्याबाबत नमूना सहपत्र १ प्रपत्रात मद्दा क्र. १ ते १० नुसार प्रत्येक प्रकरणानिहाय विवेचन / कारणमिमांसा देखील सादर करावी. तसेच माहिती निरंक असल्यास तसेही समिती अध्याक्षांना कळवावे. **घटक प्रमुखांनी त्यांची माहिती परस्पर या कार्यालयास पाठवू नये किंवा त्यांची प्रतही पाठवू नये.**

३. **समित्यांच्या अध्यक्षांना विनंती करण्यात येते की,** त्यांनी घटक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीचा आढावा घेण्याकरिता **समितीची बैठक अत्यंत तातडीने आयोजित करावी** व संशयास्पद सचोटी असलेल्या अधिका—यांची यादी तयार करून ती नमुना सहपत्र १ मधील माहितीसह (प्रत्येक अधिका—यांबाबत स्वतंत्रपणे) दिनांक १०.०७.२०१५ पर्यंत २ प्रतीत या कार्यालयास पाठवावी.

(आशुतोष डुम्बरे)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
अपर पोलीस महासंचालक गु.अ.वि. म.रा. पुणे
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
अपर पोलीस महासंचालक,(नियाजन व समन्वय) म.रा. मुंबई

अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, मुंबई/लोहमार्ग म.रा. मुंबई/प्रशिक्षण व खास पथके, म.रा. मुंबई/वाहतूक म.रा. मुंबई/रा.रा.पो.बल, मुंबई

संचालक पोलीस बिनतारी संदेश, पुणे /महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक परिक्षेत्रीय /महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, मुंबई/ मोटार परिहवन विभाग, पुणे/रा.रा.पो.बल, पुणे/ नागपूर

विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर

विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे/फोर्सवन् मुंबई

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली,

सर्व पोलीस अधीक्षक, ( जिल्हा लोहमार्ग /बिनतारी संदेश)

सर्व समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र. १ ते १५

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र

प्रत माहीतीकरीता सस्नेह अग्रेषित :–

महासंचालक, अॅन्टी करप्शन् ब्युरो, म.रा. मुंबई